मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीरातीसाठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# 'डीबीटी' च्या माध्यमातून विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप!

## अतिरिक्त आयुक्तांनी शाळांना अचानक भेट देत केली शालेय साहित्याची तपासणी

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील यांनी आज सकाळी अचानक महापालिकेच्या चऱ्होली बु. येथील पंडित जवाहरलाल नेहरू प्राथमिक शाळेला भेट दिली. यावेळी त्यांनी बाकावर बसून विद्यार्थ्यांशी संवाद साधला. तसेच थेट लाभ हस्तांतरण म्हणजेच डीबीटी उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना वाटप करण्यात आलेल्या शालेय साहित्याची तपासणी केली. यंदाच्या वर्षी मिळालेले साहित्य कसे वाटते, याबाबत विद्यार्थ्यांच्या प्रतिक्रियाही त्यांनी जाणून घेतल्या.



पिंपरी चिंचवड महापालिकेने विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटपासाठी डीबीटी उपक्रम सुरू केला आहे. महापालिकेच्या १४६ शाळांमधील विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचा थेट लाभ मिळावा, या उद्देशातून सुरू करण्यात आलेल्या या उपक्रमातून सर्व विद्यार्थ्यांना शालेय साहित्य किट मिळाले आहे का, याची तपासणी आता शिक्षण विभागाने सुरू केली आहे. त्या अनुषंगाने अतिरिक्त आयुक्त जांभळे पाटील यांनी थेट आज चऱ्होली बु. येथील शाळेला अचानक भेट देत तपासणी केली. तसेच विद्यार्थ्यांसोबत संवाद साधत त्यांच्याकडून शैक्षणिक साहित्याचा दर्जा कसा आहे, हे देखील जाणून घेतले.

चऱ्होली बु. शाळेतील जवळपास ९० टक्के विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे कीट मिळाले असल्याचे निर्दशनास आले. तर उर्वरीत विद्यार्थ्यांना अद्याप कीट का मिळाले नाही, याबाबत अतिरिक्त आयुक्त जांभळे पाटील यांनी माहिती घेतली. त्यानंतर तातडीने शैक्षणिक साहित्याचे कीट मागवून घेत विद्यार्थ्यांना वाटप केले. यावेळी सदर शैक्षणिक कीट स्वतःच्या हाताने फोडून त्यामध्ये असणाऱ्या साहित्याची तपासणी जांभळे पाटील यांनी केली. यावेळी काही विद्यार्थ्यांना गणवेश व शूज मिळाले नसल्याचे लक्षात आल्यानंतर जांभळे पाटील यांनी विद्यार्थ्यांना दोन दिवसाच्या आत गणवेश व शूज देण्याचे निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना दिले. तसेच विद्यार्थ्यांना देण्यात आलेल्या शैक्षणिक साहित्याचा पुरेपूर वापर होईल, याची काळजी घेण्याची सूचनाही शाळेल्या शिक्षकांना दिल्या.

### शालेय पोषण आहाराची घेतली माहिती

» विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या शालेय पोषण आहाराच्या गुणवत्तेबाबत देखील अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील यांनी माहिती घेतली. तसेच पोषण आहाराची गुणवत्ता आणि प्रमाण तपासण्यासाठी तो स्वतः खाऊन पाहिला. विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या आहाराची गुणवत्ता ही उत्तमच असावी. त्याची वेळोवेळी शाळेतील मुख्याध्यापक, शिक्षक यांनी तपासणी करावी. त्यामध्ये कुठलाही हलगर्जीपणा करू नका, असे निर्देशही त्यांनी दिले.

# मुंबई उच्च न्यायालयाचे खंडपीठ पुण्यात स्थापन करा

## खासदार श्रीरंग बारणे यांची केंद्रीय कायदा मंत्री अर्जुनराम मेघवाल यांच्याकडे मागणी

**पिंपरी | प्रतिनिधी**

पुणे जिल्ह्याची लोकसंख्या दीड कोटींपर्यंत पोहोचली आहे. महाराष्ट्रातील मोठ्या शहरांमध्ये पुण्याची गणना होते. त्यामुळे मुंबई उच्च न्यायालयाचे खंडपीठ पुण्यात स्थापन करण्याची मागणी शिवसेनेचे मावळचे खासदार श्रीरंग बारणे यांनी केंद्रीय कायदा मंत्री अर्जुनराम मेघवाल यांच्याकडे केली आहे.



खासदार बारणे यांनी कायदा मंत्री मेघवाल यांची दिल्लीत भेट घेतली. पुण्यात खंडपीठ स्थापन होण्याबाबतची गरज त्यांच्या निदर्शनास आणून दिली. या मागणीचे सविस्तर निवेदन त्यांना दिले. खासदार बारणे यांनी निवेदनात म्हटले आहे की, पुणे, पिंपरी-चिंचवडसह लगतच्या अहिल्यानगर, सातारा, सोलापूर जिल्ह्यातील लोकसंख्या वाढत आहे. त्यामुळे न्यायालयीन प्रकरणांमध्येही वाढ होत आहे. पुणे महानगर क्षेत्राची लोकसंख्या आजमितीला दीड कोटीपर्यंत जाऊन पोहोचली आहे. औद्योगिक, आयटी हब, सांस्कृतीक, शिक्षणाचे माहेरघर असलेले पुणे मोठ्या झपाट्याने विस्तारत आहे. मुंबई उच्च न्यायालयातील खटल्यांपैकी ४५ टक्के खटले पुणे जिल्ह्यातील आहेत.

पुण्यात खंडपीठ नसल्याने पक्षकारांना खटल्याच्या सुनावणीसाठी सातत्याने मुंबईला जावे लागते. प्रवासात चार तासांचा वेळ जाण्याबरोबरच आर्थिक खर्च आणि मानसिकत्रासही सहन करावा लागत आहे. अहिल्यानगर, सातारा, सोलापूर जिल्हे भौगोलिकदृष्ट्या पुणे जिल्ह्यालगत आहेत. या जिल्ह्यातील नागरिकांनाही या समस्यांना सामोरे जावे लागते. सद्यस्थितीत नागपूर आणि छत्रपती संभाजीनगर येथे मुंबई उच्च न्यायालयाचे खंडपीठ कार्यरत आहे. त्यामुळे या भागातील लोकांना न्यायाचा लाभ मिळत आहे. कोल्हापूरमध्येही मुंबई उच्च न्यायालयाचे खंडपीठ स्थापन करण्यात येत आहे. नागरिकांना वेळेवर, जलदगतीने न्याय मिळणे आवश्यक आहे. न्यायाला होत असलेल्या विलंबामुळे नागरिकांचा न्याय पालिकेवरील विश्वास कमी होताना दिसून येत आहे. न्याय पालिकेवरील विश्वास मजबूत करण्यासाठी जलदगतीने न्याय मिळणे आवश्यक आहे. त्यामुळे पुण्यात मुंबई उच्च न्यायालयाचे खंडपीठ स्थापन करावे, अशी मागणी खासदार बारणे यांनी निवेदनातून केली आहे.

# विसर्जन मिरवणूक सकाळी साडेसातला सुरू करा

## सकाळी 10 ते 5 मानाचे गणपती लक्ष्मी रस्ता सोडतच नाहीत; सकाळी सातच्या मिरवणुकीवर 100 मंडळे ठामच

**पुणे | प्रतिनिधी**

'लक्ष्मी रस्त्यासह सर्व मार्गावरील विसर्जन मिरवणूक सकाळी साडेसातला सुरू करावी,' अशी मागणी पुणे शहर गणेशोत्सव समितीच्या माध्यमातून विविध गणेश मंडळांनी सोमवारी केली. याबाबत मानाच्या गणपती मंडळांशी संवाद साधण्यात येणार आहे. मुख्य मिरवणूक नेहमीच्या वेळेनुसार सुरू होणार असेल, तर लक्ष्मी रस्त्यावरून अन्य मंडळांना मिरवणूक सुरू करण्याची परवानगी द्यावी, अशी प्रशासनाकडे मागणी करण्याचा निर्णय मंडळांनी घेतला.



पुणे शहर गणेशोत्सव समितीतर्फे आयोजित बैठकीस निमंत्रक संजय बालगुडे, ज्येष्ठ नेते श्रीकांत शिरोळे, अंकुश काकडे, निंबाळकर तालीम मंडळाचे ज्येष्ठ कार्यकर्ते सुरेश पवार, हत्ती गणपती मंडळाचे अध्यक्ष श्याम मानकर, साखळीपीर तालीम राष्ट्रीय मारुती मंदिराचे अध्यक्ष रवींद्र माळवदकर, भरत मित्र मंडळाचे बाळासाहेब दाभेकर, गरुड गणपती मंडळाचे सुनील कुंजीर, सेवा मित्र मंडळाचे शिरीष मोहिते, उदय महाले, नरेंद्र व्यवहारे, मनीष साळुंके, अजय दराडे, विनायक धारणे यांच्यासह विविध गणेश मंडळांचे पदाधिकारी उपस्थित होते. बालगुडे यांनी प्रास्ताविकामध्ये बैठकीची भूमिका मांडली.

'सकाळी सात वाजता विसर्जन मिरवणूक सुरू करण्याचा निर्णय झाला, तर आम्ही एका पथकासह सहभागी होण्यास तयार आहोत,' असे बाल विकास मंडळाचे कार्याध्यक्ष कुणाल गिरमकर यांनी सांगितले. 'वाद न होता मार्ग काढायचा आहे. ज्या आवाजातून अनेकांना बहिरेपणा येऊ शकतो असे प्लाझ्मा स्पीकर लावता कामा नये,' अशी अपेक्षा व्यक्त करून, मोहिते यांनी 'मानाच्या गणपती मंडळांना पथकांची आणि वेळेची मर्यादा घालून दिली पाहिजे,' अशी मागणी केली.

'विसर्जन मिरवणुकीमुळे मंडळे बदनाम झाली आहेत. लक्ष्मी रस्त्यावरून जाणाऱ्या तीनशेपैकी आठ मंडळांनी दहा तास घेतले, हा अभ्यास प्रशासनापुढे मांडला पाहिजे. लक्ष्मी रस्त्यावर वादन करण्यासाठी ढोल-ताशा पथके बिदागी घेत नाहीत. अन्य मंडळांना भरभक्कम बिदागी द्यावी लागते,' असे मानकर यांनी नमूद केले.

माळवदकर म्हणाले, 'खड्डे बुजविणे, विद्युत दिवे ही कामे करण्यासाठी महापालिका आहे. त्यासाठी राज्य उत्सव निधीतून पैसे खर्च करू नयेत. ठेकेदार आणि दलाल पोसले गेले, तर त्याला कडाडून विरोध केला पाहिजे. अनुदान मंडळ कार्यकर्त्यांच्या पदरात कसे पडेल, हे पाहिले पाहिजे.'

'डीजे वाजवणाऱ्या मंडळांबरोबर आम्ही नाही. गणेशोत्सवात राजकारण येता कामा नये. नेतेमंडळींना दर्शनासाठी दुपारी बोलवावे. ते संध्याकाळी आले, तर कोंडी आणि रस्ते बंद करण्याचा नागरिकांना त्रास होतो,' असे काकडे यांनी सांगितले.

### मंडळांची भूमिका

- » मानाचे पाच गणपती सकाळी लवकर निघाले आणि १२ पर्यंत समाधान चौकात पोहोचले तर मागच्या मंडळांना न्याय मिळेल.
- » ३० तास चालणारी मिरवणूक वेळेत पूर्ण होईल.
- » मानाच्या गणपती समोरील ढोल पथकांची संख्या मर्यादित करावी जेणेकरून पथके जास्त वेळ लावणार नाहीत.
- » मानाच्या गणपतींप्रमाणे इतर मंडळांनाही न्याय मिळायला हवा.

### नवे मार्ग सुरू करू

» 'सर्व मंडळांनी लक्ष्मी रस्त्याने जाण्याचा आग्रह धरू नये. ३०-३५ तास विसर्जन मिरवणूक हा वेळेचा अपव्यय आहे. पूर्वी ग्रामीण असलेला भाग महापालिकेत आल्याने आता शहरी झाला असून, तेथे आपल्यापेक्षा चांगला उत्सव होतो. लोकजागृती हा मूळ उद्देश कायम राहील, याची दक्षता घेतली पाहिजे. लक्ष्मी रस्त्याने आठ गणपती मंडळांना जाऊ देत. शहर वाढले असेल, तर आपण नवे मार्ग सुरू केले पाहिजेत,' याकडे श्रीकांत शिरोळे यांनी लक्ष वेधले.

# पिंपरी-चिंचवडमध्ये 'मिनी खान्देश' फुलला

## कानबाई उत्सव खान्देशी संस्कृतीच्या एकजुटीचा प्रयत्न : गिरीश महाजन

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवडमध्ये खान्देशी बांधवांनी आपली संस्कृती जपून शहराला 'मिनी खान्देश'चे स्वरूप दिले आहे, असे गौरवोद्गार जलसंपदामंत्री गिरीश महाजन यांनी काढले. पिंपरी-चिंचवडमध्ये आयोजित 'खान्देश सार्वजनिक श्री कानबाई माता उत्सव २०२५' च्या उद्घाटन समारंभात ते बोलत होते. हा उत्सव केवळ एक धार्मिक सोहळा नसून, आपल्या संस्कृती आणि परंपरेचा जागर असल्याचेही त्यांनी सांगितले.

काल दुपारपासूनच उत्सवाची सुरुवात श्री कानबाई मातेच्या भव्य मिरवणुकीने झाली. श्री तुळजाभवानी मंदिर, शिवनगरी येथून सुरू झालेली ही मिरवणूक आहेर गार्डन, वाल्हेकरवाडी येथे पोहोचली. मिरवणुकीमध्ये शिरपूर येथील गोल्डन बँड आणि अमळनेर येथील राधे कृष्ण बँडच्या संगीताने एक वेगळीच ऊर्जा संचारली होती. या मिरवणुकीचे मुख्य आकर्षण धुळे आणि नंदुरबार येथील आदिवासी समाज बांधवांचे नेत्रदीपक नृत्य ठरले. पारंपरिक वेशभूषेत, डोक्यावर कलश घेऊन चालणाऱ्या महिला आणि पारंपरिक पोशाखातील पुरुषांचा सहभाग लक्षवेधी होता.



महाजन आपल्या भाषणात म्हणाले, "आज पिंपरी-चिंचवडमध्ये हजारो खान्देशी बांधवांना एकत्र आलेले पाहून मला खूप आनंद होत आहे. हा उत्सव केवळ पूजा-अर्चा किंवा विधीचा कार्यक्रम नाही, तर आपल्या संस्कृतीचा आणि परंपरेचा जागर आहे. पिंपरी-चिंचवड हे एक असे शहर आहे, जिथे महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून लोक आले आहेत आणि या शहराने सर्वांना आपलेसे केले आहे. कामासाठी, रोजगारासाठी आपण इथे आलो असलो तरी, आपली संस्कृती आणि परंपरा आपण विसरलेलो नाही, हेच या उत्सवातून सिद्ध होत आहे. खान्देशाची संस्कृती, अहिराणी भाषा आणि लोककला समृद्ध आहेत. आपली ही समृद्ध परंपरा पुढील पिढीपर्यंत पोहोचवणे हे आपले कर्तव्य आहे. कानबाई माता ही खान्देशातील प्रत्येकाच्या घरात असलेली देवता आहे. या मातेचा आशीर्वाद आपल्या सर्वांवर असाच राहो, अशी मी प्रार्थना करतो. तुम्ही सर्वजण एकत्र येऊन हा उत्सव साजरा करत आहात, ही एक चांगली गोष्ट आहे. हा उत्साह असाच कायम राहो!"

सायंकाळी आहेर गार्डन येथे मुख्य कार्यक्रमाला सुरुवात झाली. राज्याचे जलसंपदा मंत्री गिरिश महाजन आणि उच्च शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते श्री कानबाई मातेचे पूजन करून उत्सवाचे उद्घाटन करण्यात आले.

उच्च शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी आपल्या भाषणात सांगितले की, "खान्देशातील बांधवांनी पिंपरी-चिंचवडमध्ये येऊन आपली संस्कृती आणि परंपरा जपली आहे, हे पाहून मला अभिमान वाटतो. या शहरात 'मिनी महाराष्ट्र' पाहायला मिळतो आणि आजचा हा उत्सव त्याचाच एक भाग आहे. कानबाई माता ही शक्तीचे प्रतीक असून, तिचे आशीर्वाद आपल्याला सदैव मिळोत. खान्देशी बांधवांनी आपले पारंपरिक लोकसंगीत, आपली भाषा आणि प्रथा जपायला हव्यात."

कार्यक्रमात जलसंपदामंत्री गिरिश महाजन, उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, खासदार श्रीरंग बारणे, आमदार मंगेश चव्हाण, शंकर जगताप, उमा खापरे, राजू मामा भोळे, भाजपा शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे, धुळ्याचे माजी आमदार कुणाल पाटील, सुरेखा जाधव यांच्यासह स्थानिक नगरसेवक, पदाधिकारी आणि सर्व खान्देशी समाज बांधव उपस्थित होते.

# ध्वनी प्रदूषण नियमांचे उल्लंघन करणारे 'रडार'वर

## पिंपरी-चिंचवड महापालिकेकडून चार सदस्यीय 32 प्रभाग रचनेचे नकाशे तयार करण्यात आले आहेत

**पिंपरी | प्रतिनिधी**

राज्यात ध्वनीक्षेपक आणि ध्वनी प्रदूषणाच्या वाढत्या त्रासाबाबत उच्च न्यायालयाने गांभीर्याने दखल घेतली आहे. त्यानुसार, राज्य पोलिस महासंचालक कार्यालयाने सर्व पोलिस आयुक्त, अधीक्षक आणि घटक प्रमुखांना कडक कारवाईसाठी सविस्तर परिपत्रक जारी केले आहे. त्यामुळे बेकायदा लावलेले तसेच परवानगी घेऊनही नियमांचे उल्लंघन करणारे ध्वनीक्षेपक आता पोलिसांच्या 'रडार' वर आले आहेत.

महसंचालक कार्यालयाने यासाठी तपशीलवार कार्यपद्धती ठरवली आहे. यानुसार, एखाद्या व्यक्तीने ध्वनीक्षेपकामुळे होणाऱ्या ध्वनी प्रदूषणाबाबत तक्रार केल्यास संबंधित पोलिस ठाण्याचे प्रभारी अधिकारी किंवा त्यांनी नियुक्त केलेला पोलिस उपनिरीक्षक (किंवा वरिष्ठ अधिकारी) घटनास्थळी ध्वनीमापक यंत्रासह तातडीने भेट देणार आहे. तपासणीदरम्यान दोन पंचांच्या उपस्थितीत डेसिबल पातळीची मोजणी करून पंचनामा तयार केला जाणार आहे.

या पंचनाम्यात ध्वनीक्षेपकाचा तपशील, वास्तूचा पत्ता, मालकाची माहिती, ती जागा धार्मिक स्थळ असल्यास त्याची नोंदणी, कार्यकारी मंडळातील सदस्यांची नावे आणि त्या परिसराचा झोनिंग प्रकार (निवासी, व्यावसायिक, औद्योगिक, शांतता झोन) यांचा समावेश बंधनकारक असेल. झोनिंगची स्पष्टता नसल्यास पंचांच्या मदतीने वस्तुस्थिती नोंदवून पुढील कारवाई केली जाणार आहे.

बेकायदा ध्वनीक्षेपक किंवा परवानगी असूनही डेसिबल मर्यादा ओलांडणाऱ्या यंत्रणांवर तातडीने कारवाई करावी. संबंधित कारवाईचा मासिक अहवाल प्रत्येक महिन्याच्या 5 तारखेपर्यंत विशेष पोलिस महानिरीक्षक (कायदा व सुव्यवस्था), मुंबई यांच्याकडे पाठवणे बंधनकारक असेल, असे आदेश महसंचालक कार्यालयाने सर्व घटक प्रमुखांना दिले आहेत.

पहिल्यांदा नियमभंग करणाऱ्यांना चेतावणी देण्यात येणार आहे. मात्र, पुन्हा उल्लंघन झाल्यास महाराष्ट्र पोलिस कायदा कलम 136 नुसार गुन्हा नोंदवून ध्वनीक्षेपक जप्त केला जाईल. तपास पूर्ण करून न्यायालयात आरोपपत्र दाखल करावे, असे स्पष्ट निर्देश उच्च न्यायालयाने दिले आहेत.

डेसिबल मर्यादा ओलांडणे, परवानगीशिवाय यंत्रणा लावणे, झोनिंग नियमांचे उल्लंघन याकडे प्रशासन दुर्लक्ष करते, अशी नागरिकांची तक्रार आहे. कायद्यात तरतुदी असूनही अंमलबजावणी अपुरी पडल्याचे चित्र दिसते. त्यामुळे यंदा महासंचालक कार्यालयाच्या सूचनांची प्रत्यक्षात कितपत प्रभावी अंमलबजावणी होते, हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे



### नियमभंग केल्यास दुहेरी कारवाई

» तपासणीनंतर प्रभारी अधिकारी अहवाल पोलिस आयुक्त किंवा अधिक्षकांकडे सादर करणार आहेत. या अहवालाची प्रत महाराष्ट्र राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळालाही दिली जाईल. मंडळ स्वतंत्रपणे पर्यावरण संरक्षण कायदा आणि ध्वनी प्रदूषण नियमांनुसार तक्रार दाखल करू शकते. त्यामुळे नियमभंग करणाऱ्यांवर पोलिसांबरोबरच पर्यावरण विभागाकडूनही कारवाई होणार आहे.

### करावास अन् दंडाची तरतूद

» पोलिस कायदा कलम 136 : 3 महिने कारावास व 5 हजार रुपये दंड

» पर्यावरण संरक्षण कायदा : 5 वर्षांपर्यंत कारावास व 1 लाख रुपये दंड

» कलम 38 अंतर्गत आदेश न पाळणाऱ्यावर कलम 149 नुसार स्वतंत्र गुन्हा नोंदवता येणार असून, त्यामध्ये 4 महिने ते 1 वर्षांपर्यंत कारावासाची तरतूद आहे.

### आवाजाची मर्यादा

» निवासी क्षेत्र : दिवसा 55 / रात्री 45 डेसिबल

» व्यावसायिक क्षेत्र : दिवसा 65 / रात्री 55 डेसिबल

» औद्योगिक क्षेत्र : 75 / 70 डेसिबल

» शांतता क्षेत्र : दिवसा 50 / रात्री 40 डेसिबल

# अनधिकृत होर्डिंग, फ्लेक्स, किऑक्स लावल्यास गुन्हा

## महापालिकेच्या आकाशचिन्ह व परवाना विभागाचे उपायुक्त राजेश आगळे यांनी दिला इशारा

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहरात अनधिकृतपणे लावले जाणारे होर्डिंग, फ्लेक्स, पोस्टर्स, बॅनर, किऑस्क यामुळे शहराचे विद्रुपीकरण होत आहे. अशा पद्धतीने अनधिकृतपणे फलक लावणाऱ्यांवर फौजदारी कारवाई केली जाणार आहे. तसेच, दंडात्मक कारवाई केली जाईल. असा इशारा महापालिकेच्या आकाशचिन्ह व परवाना विभागाचे उपायुक्त राजेश आगळे यांनी दिला आहे.

यापूर्वीही महापालिकेने 6 फेब्रुवारी 2024 रोजी अशीच कार्यवाही करून शहरातील मोठ्या प्रमाणावरील अवैध फलक हटवले होते. त्यानंतरही अनेक ठिकाणी अनधिकृत जाहिराती पुन्हा दिसू लागल्याने महापालिकेच्या आकाशचिन्ह व परवाना विभागाने याबाबत पुन्हा कठोर भूमिका घेतली आहे.

शहरात कोणतीही व्यक्ती, संस्था, व्यापारी, उद्योजक, राजकीय कार्यकर्ते यांनी शहरामध्ये महापालिकेची पूर्वपरवानगी न घेता जाहिरात होर्डिंग, फलक, पोस्टर्स, किऑक्स, बॅनर्स किंवा फ्लेक्स लावल्यास त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्यात येईल. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार व शासनाच्या परिपत्रकानुसार कार्यवाही केली जात आहे.

शहरातील सार्वजनिक ठिकाणी लग्न, वाढदिवस, स्वागत, निवडणूक, धार्मिक व अन्य कार्यक्रमांचे फ्लेक्स व फलक लावले जातात. यामुळे केवळ शहर विद्रुप होते. वाहतुकीस अडथळा निर्माण होतो. त्यामुळे अशा प्रकारच्या फ्लेक्स, होर्डिंग, किऑक्स व फलकांवर क्षेत्रीय कार्यालयाच्या पथकांकडून कारवाई केली जात आहे. त्याबाबत सर्व राजकीय पक्षाचे लोकप्रतिनिधी व शहराध्यक्षांनाही सूचित करण्यात आले आहे.

अनधिकृतपणे लावले जाणारे होर्डिंग, फ्लेक्स, पोस्टर्स, बॅनर, किऑस्क यामुळे शहराचे विद्रुपीकरण होत आहे. अशा पद्धतीने अनधिकृतपणे फलक लावणाऱ्यांवर फौजदारी कारवाई केली जाणार आहे. तसेच, दंडात्मक कारवाई केली जाईल. असा इशारा महापालिकेच्या आकाशचिन्ह व परवाना विभागाचे उपायुक्त राजेश आगळे यांनी दिला आहे.



### अधिकृत होर्डिंगवर जाहिरात लावावी

» सर्व नागरिक, संस्था, व्यापारी, उद्योजक व राजकीय पक्षांना शहरातील कोणत्याही भागात अनधिकृत होर्डिंग, फलक, पोस्टर्स, बॅनर, फ्लेक्स किंवा किऑस्क लावू नयेत. याप्रकरणी कोणतीही तडजोड केली जाणार नाही. महापालिकेने परवानगी दिलेल्या अधिकृत होर्डिंगवर जाहिरात लावावी, असे महापालिकेच्या आकाशचिन्ह व परवाना विभागाचे उपायुक्त राजेश आगळे यांनी सांगितले.

# वाकडेवाडी एसटी स्थानकाजवळ आता कूल कॅबला थांबा

## ‘आरटीए’ची मान्यता स्थानकाबाहेरून कुलकॅबला करता येणार प्रवासी वाहतूक

**पुणे | प्रतिनिधी**

वाकडेवाडी येथील एसटी स्थानकाबाहेरून प्रवासी वाहतूक करण्यासाठी कुल कॅब टॅक्सीला परवानगी देण्यात आली आहे. त्याकरिता एक थांबादेखील देण्यात आला आहे. आरटीएच्या (रिजनल ट्रान्स्पोर्ट अँथोरिटी) नुकत्याच झालेल्या बैठकीत याबाबतच्या प्रस्तावाला मान्यता देण्यात आली आहे.

एसटी स्थानकाबाहेरून प्रवासी वाहतूक करायला यापूर्वी कूल कॅबला परवानगी नव्हती. यामुळे एसटीने वाकडेवाडी येथे बाहेरगावावरून आलेल्या प्रवाशांना शहरात निश्चित ठिकाणी जाण्यासाठी कूल कॅबचा पर्याय उपलब्ध नव्हता. आता आरटीएच्या बैठकीत या प्रस्तावाला मान्यता मिळाल्यामुळे एसटीच्या प्रवाशांना कूल कॅबदेखील उपलब्ध होणार आहेत. यामुळे येथून प्रवास करणाऱ्या प्रवाशांना दिलासा मिळणार आहे.

कूल कॅबमध्ये ए.सी.च्या सोयीमुळे उन्हाळ्यात किंवा गर्दीच्या वेळी प्रवास अधिक आरामदायक होतो. सामान्य टॅक्सींच्या तुलनेत कूल कॅबचे भाडे थोडे जास्त असते. ही टॅक्सी बहुतेक वेळा पांढऱ्या, निळ्या किंवा इतर विशिष्ट रंगात असते. त्यामुळे त्या सामान्य टॅक्सींपेक्षा सहज ओळखता येतात.

वाकडेवाडी येथील एसटी स्थानकाबाहेरून प्रवासी वाहतूक करण्यासाठी कुल कॅब टॅक्सीला परवानगी देण्यात आली आहे. त्याकरिता एक थांबादेखील देण्यात आला आहे. आरटीएच्या (रिजनल ट्रान्स्पोर्ट अँथोरिटी) नुकत्याच झालेल्या बैठकीत याबाबतच्या प्रस्तावाला मान्यता देण्यात आली आहे.

पुण्यात कूल कॅब या टॅक्सीसाठी फक्त पुणे विमानतळ आणि पुणे रेल्वे स्थानकावरच थांबे देण्यात आले आहेत. आता मात्र वाकडेवाडी एसटी स्थानकाबाहेरही या कूल कॅब टॅक्सीला अधिकृत थांबा मिळाला आहे. या गाड्या फक्त पुणे-मुंबई-पुणे अशीच सेवा पुरवितात, अशी माहिती आहे.



### पुण्यातील टॅक्सी थांबे

» पुण्यात कूल कॅब या टॅक्सीसाठी फक्त पुणे विमानतळ आणि पुणे रेल्वे स्थानकावरच थांबे देण्यात आले आहेत. आता मात्र वाकडेवाडी एसटी स्थानकाबाहेरही या कूल कॅब टॅक्सीला अधिकृत थांबा मिळाला आहे. या गाड्या फक्त पुणे-मुंबई-पुणे अशीच सेवा पुरवितात, अशी माहिती आहे.

### कूल कॅब म्हणजे काय?

» कूल कॅब ही एक टॅक्सी सेवा आहे, ती मुख्यतः महाराष्ट्रातील, विशेषतः मुंबई आणि पुणे यांसारख्या मोठ्या शहरांमध्ये चालते. कूल कॅब ही सामान्य काळ्या-पिवळ्या टॅक्सींपेक्षा वेगळी आहे. कारण ती वातानुकूलित (एसी) असते.कूल कॅबमध्ये ए.सी. च्या सोयीमुळे उन्हाळ्यात किंवा गर्दीच्या वेळी प्रवास अधिक आरामदायक होतो. सामान्य टॅक्सींच्या तुलनेत कूल कॅबचे भाडे थोडे जास्त असते. ही टॅक्सी बहुतेक वेळा पांढऱ्या, निळ्या किंवा इतर विशिष्ट रंगात असते. त्यामुळे त्या सामान्य टॅक्सींपेक्षा सहज ओळखता येतात.

### शहरात किती कूल कॅब?

» 2023-24 मध्ये 8 कूल कॅबची नोंदणी आरटीओत झाली होती.
» 2024-25 मध्ये फक्त 4 कूल कॅबची नोंदणी झाली आहे.
» शहरातील एकूण कूल कॅबची नोंदणी 282 इतकी आहे.

“ वाकडेवाडी एसटी स्थानकावरील प्रवाशांची सोय लक्षात घेऊन, आरटीच्या बैठकीत हा प्रस्ताव ठेवण्यात आला होता. त्याला मान्यता मिळाली आहे. यामुळे प्रवाशांना येण्या जाण्यासाठी अधिकचा पर्याय उपलब्ध झाला असून, त्यांचा प्रवास अधिक सुलभ होणार आहे.

- स्वप्निल भोसले, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, पुणे.

# ऐतिहासिक वारसास्थळ म्हणून घोषित झालेले मंदिर

## 17 व्या शतकात पेशव्यांचे आध्यात्मिक गुरु शिवरामभट चित्रावस्वामी यांनी या मंदिराची उभारणी केली असल्याचे सांगितले जाते.

**पुणे | प्रतिनिधी**

ऐतिहासिक वारसास्थळ म्हणून घोषित झालेले प्रथम दर्जाने संरक्षित असलेले शनिवार पेठेतील ओंकारेश्वर मंदिर हे पेशवेकालीन आहे. 17 व्या शतकात पेशव्यांचे आध्यात्मिक गुरू शिवरामभट चित्रावस्वामी यांनी या मंदिराची उभारणी केली असल्याचे सांगितले जाते.

या मंदिराच्या निर्मितीविषयी अशी आख्यायिका सांगितली जाते की, पेशव्यांचे आध्यात्मिक गुरू शिवरामभट चित्रास्वामी यांनी ध्यानधारणा करण्यासाठी गणेशखिंड येथील गणेश मंदिरांचा जीर्णोद्धार केला. मंदिराचा केलेला विकास, येथील शांत वातावरण यामुळे ध्यानधारणासाठी शहरातील लोक रोज तिथे येऊ लागले.

त्यांना पिण्याच्या पाण्याची सोय व्हावी म्हणून चित्रास्वामी यांनी जवळच बुजून गेलेल्या विहिरीत गाळ उपसण्याचे काम हाती घेतले. विहिरीतील गाळाचा उपसा करत असतानाच त्यांना सोन्याच्या मोहरा सापडल्या. त्यांनी त्या पेशव्यांना सादर केल्या.

पेशव्याने त्या विश्वासाने स्वीकार करीत याचा वापर कसा करावा याविषयीचा सल्ला विचारला. इ.स. 1800 च्या सुरुवातीला पुणे शहरात कोणतेही मंदिर नव्हते. पुण्येश्वर-नारायणेश्वर मंदिरे उद्ध्वस्त झाली होती. त्यामुळे शंकराचे भव्य मंदिर उभारावे, अशी इच्छा शिवभक्त चित्रावस्वामी यांनी पेशव्यांकडे केली. शंकराचा वास्तव्य स्मशानात असतो, असा म्हटले जाते. त्यामुळे मुठा नदीकाठची जागा त्यांनी निवडली. शनिवारपेठेतील नदी वळते तेथे त्यांची निर्मिती त्यांनी केली.



### श्रावणमासात अभिषेक-लघुरुद्रची व्यवस्था

» मंदिरात दरवर्षी 5 महत्त्वाचे कार्यक्रम होतात. महारुद्र अभिषेक, हवन पूजा स्त्रीयांमार्फत केली जाते. श्रावणी सोमवारी अभिषेक मंदिराच्या पिंडीवर चक्क्याची पूजा मांडली जाते. याशिवाय त्रिपुरारी पौर्णिमा, महाशिवरात्र असे विविध कार्यक्रम दरवर्षी होत असतात. श्रावणमासानिमित्त चारही सोमवारी भाविकांसाठी अभिषेक-लघुरुद्र करण्याची व्यवस्था करण्यात आली आहे.

“ ओंकारेश्वर मंदिर पुणे शहरातील सर्वात मोठे मंदिर आहे. या मंदिराची पेशवे दफ्तरी यांची नोंद आहे. 8 दिशादर्शक कळस व 9 वा कळस मध्यभागी असून, संपूर्ण मंदिर दगडी भिंतीनी बांधले आहे इ.स. 1800 च्या सुरुवातीला पुणे शहरात कोणतेही मंदिर नव्हते. 1734 ते 1736 दरम्यान बांधलेल्या या मंदिरासाठी तब्बल 1 लक्ष 10 हजार रुपये खर्च आला, असे सांगितले जाते.

- धनोत्तम लोणकर, विश्वस्त, ओंकारेश्वर मंदिर